बिग मॅक्स

जगातील महान गुप्तहेर



किन प्लैट

चित्र: रॉबर्ट लोपशायर, मराठी: सुजाता सावळे



बिग मॅक्स

बिग मॅक्स

जगातील महान गुप्तहेर



किन प्लैट

चित्र: रॉबर्ट लोपशायर

मराठी: सुजाता सावळे





बिग मॅक्स जगातील महान गुप्तहेर होता.

हे प्रत्येकाला माहीत होते.

“ताबडतोब ये”, राजा ओरडला.

“कोणीतरी माझ्या बक्षीस मिळालेल्या जंबो हत्तीला पळवून नेलेय”.



पूका पूकाच्या राजाला पण माहीत होते.

त्याने बिग मॅक्सला फोन करून बोलवले.





“काळजी करू नकोस”, बिग मॅक्स म्हणाला.

“मी लगेच येतो.

आणि आपल्या हत्तीला शोधून देतो”.

“तू विमानाने येशील की बोटीने?”

“माझ्या छत्रीने येईन”, बिग मॅक्स म्हणाला.

बिग मॅक्सने एक मोठा श्वास घेतला.

आपल्या छत्रीमध्ये जोरात फुंकर मारली.

छत्रीत हवा भरली.

बिग मॅक्स आकाशात उडाला.



वाटेत त्याला काही पक्षी भेटले.

“आम्ही थंडी येण्यापूर्वी दक्षिणेकडे उडतोय”, पक्षी म्हणाले.

“तू काय करत आहेस?”

“मी एका हरवलेल्या हत्तीला शोधतोय”, बिग मॅक्स म्हणाला.


“तुला तो इथे सापडणार नाही”, त्यांच्यातील एक पक्षी म्हणाला.

“पण तू निःसंकोचपणे आजूबाजूला शोधू शकतोस”.

“धन्यवाद”, बिग मॅक्स म्हणाला.







ते एका जहाजावरून उडत गेले.

“मला काहीतरी जळल्याचा वास येतोय”, बिग मॅक्स म्हणाला.

“माफ कर आम्ही तुला मदत करू शकत नाही.

पक्षी वास घेऊ शकत नाहीत”, पक्षी म्हणाले.

बिग मॅक्स जहाजाखालून उडत गेला.

तो कप्तानाशी बोलला.

“क्षमा करा, मला काहीतरी जळल्याचा वास येतोय”, बिग मॅक्स म्हणाला.

कप्तान हसला, “हा, हा”.

तो म्हणाला, “तो धुराड्यातून निघणाऱ्या धुराचा वास आहे”.





“हा धूर तुमच्या खिशातून निघतोय”,

बिग मॅक्स म्हणाला.

“माझा पाइप!”, कप्तान ओरडला.

त्याने तो खिशातून बाहेर काढला.

“तो अजून जळतोय हे मी विसरलो.

तू खरंच एक महान गुप्तहेर आहेस”.

“मी तसा बनण्याचा प्रयत्न करतोय”,

बिग मॅक्स म्हणाला.



बिग मॅक्स उडून गेला.

पाऊस पडायला लागला.

“मी छत्रीने प्रवास करतोय ते चांगलं आहे”,

बिग मॅक्स म्हणाला.





जेव्हा तो पूका पूकाला पोहोचला,

तेव्हा बिग मॅक्स खाली उतरला.

राजा त्याची वाटच पहात होता.

“हा प्रवास करण्याचा चांगला मार्ग आहे”, राजा म्हणाला.

“त्यामुळेच मी इथे पोहोचलो”, बिग मॅक्स म्हणाला.



राजा बिग मॅक्सला राजवाड्यात घेऊन गेला.

“जर तू जंबोला शोधलस तर

मी तुला माझी सगळी संपत्ती देईन”, तो म्हणाला.

“मी त्याला जरूर शोधेन”, बिग मॅक्स म्हणाला.

राजाने बिग मॅक्सला माणकांनी भरलेली खोली दाखवली.


त्याने त्याला पाचूनी भरलेली खोली पण दाखवली.

आणि सोन्याने भरलेली खोलीही दाखवली.

“तुझा मोबदला याहीपेक्षा जास्त आहे का?”,

राजाने विचारले.

“एवढा पण जास्त नाही”, बिग मॅक्स म्हणाला.



“जंबोला कोण पळवून नेऊ शकते?”, बिग मॅक्सने विचारले.

“कोणीही”, राजा म्हणाला, “कारण जंबो जगातील सर्वात चांगला हत्ती आहे”.

“जंबो किती वर्षांचा आहे?”, बिग मॅक्सने विचारले.

“जंबो उद्या चार वर्षांचा होईल”, राजा म्हणाला.

“आहा!”, बिग मॅक्स म्हणाला.

“त्याला ओळखण्यासाठी हा काही धागा किंवा खूण आहे?”, राजाने विचारले.

“पाहू या आपण”, बिग मॅक्स म्हणाला.

“जंबो इथे खूश होता?”, बिग मॅक्सने विचारले.



“तो खूप खूश होता”, राजा म्हणाला.

“पण एक आठवड्यापूर्वीपर्यंत”.

“त्यानंतर काय झालं?”, बिग मॅक्सने विचारले.


“तो दुःखी झाला”, राजा म्हणाला.

“मी त्याला आणल्यापासून असं पहिल्यांदाच झालं”, राजा म्हणाला.

“तू त्याला कधी आणलंस?”, बिग मॅक्सने विचारले.

“जवळजवळ एक वर्षापूर्वी”, राजा म्हणाला.





“तू शेवटी जंबोला जिथे पाहिले होते तिथे मला घेऊन चल”, बिग मॅक्स म्हणाला.

राजा त्याला बाहेर घेऊन गेला.

त्याने गेटचं कुलूप उघडलं.

“इथे”, तो म्हणाला.

“ह्या आवारात”.



बिग मॅक्सने सगळीकडे बघितले.

त्याने उंच भिंतीकडे बघितले.

“हत्ती भिंतीवर चढू शकत नाहीत”,

बिग मॅक्स म्हणाला.

बिग मॅक्सने गेटकडे बघितले.


“गेट बंद केलं होतं?”, त्याने विचारलं.

“होय”, राजा म्हणाला. “आणि त्याची किल्ली फक्त माझ्याकडे होती”.

“हं”, बिग मॅक्स म्हणाला.

“हत्ती कुलूप उघडू शकत नाहीत”.





बिग मॅक्सने जमिनीकडे बघितले.

“जंबोला कोणी पळवून नेलेले नाही!”, तो म्हणाला.

“तुला कसे कळले?”, राजा म्हणाला.

“तिथे जंबोशिवाय कोणाच्याच पावलांचे ठसे नाहीत”, बिग मॅक्स म्हणाला.

“मग तो बाहेर कसा गेला?”, राजाने विचारले.

“पाहू या आपण”, बिग मॅक्स म्हणाला.

“मला एक धागा किंवा खूण दिसतेय”, बिग मॅक्स म्हणाला.

“जमीन ओली दिसतेय. पाऊस पडला होता का?”

“पूका पूकामध्ये नेहमीच पाऊस पडतो”, राजा म्हणाला.

“कदाचित तू एक चांगला गुप्तहेर नाहीयेस”.

“आपण पाहू या”, बिग मॅक्स म्हणाला.



बिग मॅक्सने खाली पाहिलं.

तो जमिनीवर बसलेला होता.

“हा बर्फ वेगाने वितळतो”,

बिग मॅक्स म्हणाला.

खूप उकाडा होता.

बिग मॅक्स विचार करत बसला.

“किती छान कल्पना आहे!”, तो म्हणाला.

उन्हाळ्यासाठी बर्फाची खुर्ची”.

“जंबोला बर्फावर बसायला आवडतं”,

राजा म्हणाला.

“म्हणूनच मी नेहमी इथे भरपूर

बर्फाच्या लाद्या ठेवायचो”.

“मला तर जास्त बर्फ दिसत नाहीये”,

बिग मॅक्स म्हणाला.

“फक्त लहान तुकडे



“भिंतीच्या दुसऱ्या बाजूला काय

आहे?”, त्याने विचारले.

“एक उंच टेकडी”, राजा म्हणाला.

“हं!”, बिग मॅक्स म्हणाला.

“आता मला समजलं की जंबो कसा पळून गेला.

आपल्याला भिंतीच्या पलीकडे बघायला हवं”,


बिग मॅक्स म्हणाला. “पटकन!”





ते लगेच भिंतीच्या पलीकडे गेले.

ते टेकडी उतरून गेले.



ते ठशांच्या मागोमाग गेले.

“जर आपल्याला जंबो कुठे गेलाय हे समजलं”,

बिग मॅक्स म्हणाला, “तर आपण तो का गेला हे शोधू शकतो”.

“मला समजलं”, राजा म्हणाला.

“हं!” बिग मॅक्स म्हणाला. “मी बरोबर ओळखलं.

बघा. इथे ठसे आहेत”.

“तू बरोबर ओळखलंस”, राजा म्हणाला.

“हे जंबोच्या पायाचे ठसे आहेत”,

बिग मॅक्स म्हणाला.

“आपण त्याचा पाठलाग केला पाहिजे”.




“हं!” बिग मॅक्स म्हणाला.

दुसरी खूण पहा. मला अश्रू दिसतायत.

राजाने त्याकडे बघितलं.

“मला माहीत नाही की जंबो इतका दुःखी होता”, तो म्हणाला.

“आपण बघूया”, बिग मॅक्स म्हणाला.



"जंबो का गेला हे जर आपल्याला कळलं",

बिग मॅक्स म्हणाला, "तर तो कुठे गेला

हेही आपल्याला कळेल".

"समजलं", राजा म्हणाला.


"तू एक महान गुप्तहेर आहेस".


"बघ आणि विचार कर", बिग मॅक्स म्हणाला.

"ते एक गुपित आहे".

त्यांनी पावलांच्या ठशांचा पाठलाग केला.

त्यांनी अश्रूंच्या खुणांचा पाठलाग केला.





ते रात्रभर चालत राहिले.

ते पुढच्या दिवशीही चालत राहिले.

त्या खुणा वरच्या दिशेने जात होत्या.

ते त्या खुणांचा पाठलाग करत होते.

अचानक बिग मॅक्स थांबला.



“थांब”, बिग मॅक्स म्हणाला.

काहीतरी चुकतंय.

आपण चुकीच्या मार्गाने चाललोय. चल पटकन!”

ते टेकडी उतरून खाली आले.

ते भरभर निघाले.

नंतर त्यांना एक मोठा आवाज ऐकू आला.

“आssssर्घ!”

“ते काय होतं?”, राजाने विचारलं.

“बघू या”, बिग मॅक्स म्हणाला. “विचार कर. तो हत्ती नव्हता.

हत्ती असा आवाज करत नाहीत.

ते आssssर्घ असे करत नाहीत!”



बिग मॅक्स म्हणाला, “मी जसा विचार केला होता,

हे हत्तीचे अश्रू नव्हते.

हे मगरीचे अश्रू होते.

ते हत्तीच्या अश्रुंपेक्षा मोठे असतात”.

“विचार करू या”, बिग मॅक्स म्हणाला.

“या रस्त्यावर लांब तीक्ष्ण पांढरे दात आहेत.

त्याची जीभ लांब, लाल आहे.

ते हत्तीचे अश्रू नाहीत तर

ते मगरीचे अश्रू आहेत.

म्हणजे ती मगरच असणार”.





बिग मॅक्स मागे वळून म्हणाला.

“माझे बरोबर होते. ती मगर आहे”,

बिग मॅक्स म्हणाला. “तू स्वतः बघ”.

“माझा तुझ्या म्हणण्यावर विश्वास आहे”,

राजा म्हणाला.

“ही एक चांगली गोष्ट आहे की

मी छत्री घेऊन आलो”, बिग मॅक्स म्हणाला.

“त्यामुळे ती आता चावू शकणार नाही”.



बिग मॅक्सने मगरीला पाण्यात ढकलले.

नंतर त्याने त्याची छत्री काढून घेतली.

“तू त्या चुकीच्या खुणांनी मला मूर्ख बनवले”,

तो मगरीला म्हणाला.

“मला माफ कर”, मगर म्हणाली.

तिच्या डोळ्यातून एक मोठा अश्रू बाहेर आला.

“बघ, ती रडत आहे”, राजा म्हणाला.

“याचा अर्थ ती खेद व्यक्त करत आहे”.

“मगरीचे अश्रू तुम्हाला मूर्ख बनवू शकतात”,

बिग मॅक्स म्हणाला.

“ती रडतेय कारण आपण तिचे रात्रीचे जेवण झालो नाही”.

“मला आठवण देऊ नकोस”, मगर म्हणाली.

त्यानंतर ती आणखी रडली.



बिग मॅक्स आणि राजा योग्य मार्गावर परत गेले.

ते जंगलातून चालत गेले.

त्यांना खूप गोंगाट ऐकू आला.

तो आवाज आणखी वाढत गेला.

जमीन हादरली.

झाडे हलू लागली. बिग मॅक्स आणि पूका पूकाचा राजा पण हलू लागले.

“आपल्याला मागे फिरायला हवं”, राजा म्हणाला.

“हा भूकंप आहे”.

“नाही”, बिग मॅक्स म्हणाला.

“हा भूकंप नाही. ही पार्टी आहे”.

“पार्टी?” राजाने विचारले.

“हत्तींची पार्टी”, बिग मॅक्स म्हणाला.

त्याने झाडांच्या मधून खुणेने दाखवले.


“पहा”, बिग मॅक्स म्हणाला.


तिथे खूप सारे हत्ती होते.

ते नाचत होते.

ते इतके जोरात नाचत होते की

त्यामुळे जमीन हादरत होती.





“ती जंबोच्या वाढदिवसाची पार्टी आहे”,

बिग मॅक्स म्हणाला.

“त्याच्या कुटुंबासोबत वाढदिवस साजरा करायचा होता

म्हणूनच तो निघून गेला”.

राजा जंबोकडे धावत गेला.

“वाढदिवसाच्या शुभेच्छा, जंबो”, तो म्हणाला.

तू मला कसे शोधले?”, जंबोने विचारले.

“बिग मॅक्सला विचार”, राजा म्हणाला.

“तिथे जंबो पण आहे” राजा म्हणाला.

“मला तो दिसतोय. तो सुद्धा नाचत आहे”.

बिग मॅक्स हसला.

“अजून एक केस किंवा प्रकरण सुटले”, तो म्हणाला.



"तू कुठे गेलास आणि


तू का गेलास हे शोधण्यासाठी


आम्ही तुझा पाठलाग केला",

बिग मॅक्स म्हणाला.

"मला अजूनही समजून घ्यायला आवडेल की

तो तिथून कसा गेला", राजा म्हणाला.





"तिथे बर्फाच्या लाद्या होत्या", बिग मॅक्स म्हणाला.


"जंबोने त्या बर्फाच्या लाद्या एकावर एक ठेवल्या.

त्याने त्याच्या पायऱ्या बनवल्या.

प्रथम त्याने मला मूर्ख बनवले,

कारण तिथे पायऱ्या दिसत नव्हत्या.

फक्त थोडा वितळलेला बर्फ होता.



“आता मला समजले की तू कसा गेला.

आता मला समजले की तू कुठे गेला.

आता मला समजले की तू का गेला”, राजा म्हणाला.

“मला माहीत नव्हते की वाढदिवसाची पार्टी इतकी महत्त्वाची असते”.

“हत्तींकरिता ती खूप महत्त्वाची असते”, बिग मॅक्स म्हणाला.

“हत्ती एकमेकांबरोबर राहणे पसंत करतात.

विशेषतः वाढदिवसाच्या दिवशी”.

जंबो बर्फाच्या पायऱ्या चढून गेला.

तो भिंतीच्या पलीकडे गेला.

भिंतीच्या मागे एक उंच टेकडी होती.

तो टेकडी उतरून खाली गेला.

“होय”, जंबो म्हणाला. “मी तसाच गेलो”.



“मला माफ करा, मला माहीत नव्हते”,

पूका पूकाचा राजा म्हणाला.


“पुढच्या वर्षी मी तुझ्या वाढदिवसाला

राजवाड्यात तुझ्या पूर्ण कुटुंबाला बोलवेन.

अशा प्रकारे आपण एकत्र येऊन वाढदिवस

साजरा करू शकतो.





“तू एक महान गुप्तहेर आहेस”,

राजा बिग मॅक्सला म्हणाला.

“जंबोला शोधून काढल्याबद्दल तू माझी

हवी ती संपत्ती घेऊ शकतोस”.

“जर तुमची काही हरकत नसेल तर”, बिग मॅक्स म्हणाला,

“मी जंबोच्या वाढदिवसाच्या केकमधील एक तुकडा घेईन”.

“माझी काही हरकत नाही”, राजा म्हणाला.

जंबोने बिग मॅक्सला व राजाला केकचे तुकडे दिले.

“काय मस्त केक आहे”, राजा म्हणाला.

मग त्याने अजून एक तुकडा घेतला.

आणि पुन्हा आणखी एक.

“खूप जास्त केक खाऊ नको”, जंबो म्हणाला.

“नाहीतर मी तुला पूका पूकाला परत घेऊन


जाऊ शकणार नाही”.

राजाने केक खाणे थांबवले.

“वाढदिवसाच्या शुभेच्छा, जंबो”, तो म्हणाला.

“वाढदिवसाच्या शुभेच्छा, जंबो”,

जंबोचे कुटुंब म्हणाले.





वाढदिवसाच्या शुभेच्छा, जंबो",
बिग मॅक्स म्हणाला.

त्याने खोल श्वास घेतला.

त्याने त्याच्या छत्रीमध्ये फुंक मारली.

"आणि टाटा, गुडबाय", जगातला एक
महान गुप्तहेर, बिग मॅक्स म्हणाला.

समाप्त